# जागृतांचे गीत हे
## Song of the Awakened
## ज्ञान प्रबोधिनी
सोलापूर - हराळी
वार्षिक वृत्त २०१२


भास्कर निवास : सन्मित्र सदन

## Jnana Prabodhini
**Solapur - Harali**
**Round the year 2012**


भास्कर निवास वास्तू उद्‌घाटन


अनुभूति विद्यालय, जळगाव


विद्याव्रत संस्कार

# ५. कथा पुरुषार्थाच्या

## जळगावचा जैन उद्योग समूह आणि परिसरातील प्रकल्पभेटी

*७, ८ आणि ९ ऑगस्ट २०१२ हे तीन दिवस आण्णा, लताताई आणि चंद्रकांत पाटील व गाडीचालक बालाजी जिरगाळे असे चौघेजण जैन उद्योग समूहाचं कार्य पाहाण्यासाठी जैन हिल्स, जळगाव, येथे गेले होते. या समूहाचे प्रेरणापुरुष माननीय भवरलालजी जैन यांचे निकट बंधुवत सहकारी श्री. रवींद्रजी नातू यांनी हा योग जुळवून आणला. जैन उद्योग समूह आणि भवरलालजी जैन हे उद्यमशील मानवी पुरुषार्थाचं उदाहरण आहे. ९ ऑगस्टला डॉ. रेखाताई आणि डॉ. रविभाऊ महाजन यांनी उभारलेला 'आर्यन पार्क कृषी पर्यटन प्रकल्प' या चौघांनी पाहिला. नंतर मॅगसेसे पारितोषिक विजेत्या श्रीमती नीलिमादीदी मिश्रा यांच्या भगिनी निवेदिता संस्थेचं कार्य बहादरपूरला जाऊन पाहिलं. त्या दिवशी सायंकाळी आपले तरुण कर्तृत्ववान मित्र श्री. यजुर्वेंद्र महाजन यांच्या 'दीपस्तंभ' या संस्थेत स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या युवकांशी आणि विविध संस्थांमधील शिक्षकांशी संवाद केला. या तीन दिवसांची ही काही आनंददायी स्मरणचित्रं.*

**रवींद्रजींची भेट :**

८ आणि ९ जुलै २०१२ला डॉ. रवींद्रजी आणि त्यांचे चुलतबंधू श्री. चंद्रकांतजी नातू हे हराळीला आले होते. रवींद्रजी हे ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यकर्त्या सुप्रियाताई कुमठेकर (गोडबोले) यांचे मामा. कृषी क्षेत्रातील, विशेषतः साखर उद्योगातील त्यांच्या कर्तृत्वाबद्दल आम्ही ऐकलं होतं. निवृत्तीनंतर काही शुभयोगाने महाराष्ट्रातील विचारवंत उद्योगपती श्री. भवरलालजी जैन यांच्या समवेत त्यांनी काम करायला सुरुवात केली. अत्यंत बहुश्रुत, प्रतिभावंत आणि उद्योगक्षेत्रातले निष्णात अनुभवी असे रवींद्रजी लवकरच भवरलालजींच्या निकटवर्ती वर्तुळात सामावून गेले. कालांतराने तर भवरलालजी त्यांना आपले धाकटे भाऊ मानू लागले. २००७ पासून आण्णा रवींद्रजींची हराळीला भेट व्हावी म्हणून प्रयत्नशील होते, पण योग येईना. अलीकडे एकदा येण्याची तारीखदेखील ठरली, परंतु भेट रहित झाली. अखेर आण्णांनी दूरभाषवर त्यांना निरोप दिला, 'We are yearning to meet you at Harali'. त्यावर मात्र त्यांचं तत्पर उत्तर आलं आणि जुलैच्या ८-९ तारखेला ते आपल्या बंधूंसह हराळीला आले.

सुरुवातीच्या थोड्या पावसाने टवटवीत झालेल्या हराळीच्या फळबागा, पवन सौर ऊर्जेची उपकरणं, वेगवेगळ्या गावांमधून आलेले आणि शेतीची नवी तंत्रं शिकणारे तरुण-तरुणी, शाळेच्या गुरुकुलातील निरागस - प्रसन्न मुलं, हे सारं वातावरण त्यांना खूप आवडलं. सकाळी सव्वासहा वाजता होणारी गायत्री मंत्राची उपासना आणि त्यानंतरची सर्वांना आवडेल नि काही महत्त्वाचं शिकवून जाईल अशी छोटीशी कथा हेही त्यांना मनापासून आवडलं. भवरलालजींच्या जैन हिल्स येथील कृषी संबंधित मूलगामी आणि व्यापक कार्य हराळीच्या कार्यकर्त्यांनी पाहायला पाहिजे व ज्ञान प्रबोधिनीने गेल्या ५० वर्षांत शिक्षणाच्या क्षेत्रात जे मौलिक तप केलं आहे त्याची ओळख जैन समूहातील कर्त्या व्यक्तींना व्हायला पाहिजे असं त्यांना उत्कटपणे वाटू लागलं. त्यातूनच ७-८-९ ऑगस्टची जळगाव भेट ठरली. स्वतः रवींद्रजी या भेटीच्या वेळी जैन हिल्सवर असणार होते.

**जैन हिल्सवर :**

रेल्वेची आरक्षणं न मिळाल्यामुळे हराळी ते जळगाव हा प्रवास खाजगी गाडीने केला. श्री. संजयजी गंभिरे यांनी त्यांची गाडी त्यासाठी उपलब्ध करून दिली होती. उतरत्या संध्याकाळी आम्ही जैन हिल्सवर पोहोचलो तेव्हा 'हिरा' या अत्यंत सुविधायुक्त, संपन्न अतिथिगृहात आमचं स्वागत करायला हसतमुख रवीन्द्रजी उपस्थित होते. 'जैन हिल्सवरील जागरण' हे भवरलालजींच्या चिंतनपर भाषणांचं संकलन प्रवासात आमच्या हाती आलं होतं. त्यासंबंधीचं एक मनोगत आम्ही रवीन्द्रजींकडे दिलं होतं. ते त्यांनी भवरलालजींना पोचवलं होतं. त्याखेरीज हराळी प्रकल्पासंबंधी आणि प्रबोधिनीच्या शैक्षणिक उपक्रमांसंबंधी एक टिपण आधीच त्यांच्याकडे विद्युत-पत्राद्वारा म्हणजे ई-मेलने पाठवलं होतं. त्याच दिवशी सायंकाळी भवरलालजींच्या नात्यातले भाऊ आणि जबाबदार सहकारी श्री. रजनीकांतजी जैन यांचीही भेट झाली. त्यांना तिथे आरबीभाऊ म्हणतात. ते खरगपूर आयआयटीचे बुद्धिमान पदवीधर. थोरल्या भाऊंच्या म्हणजे भवरलालजींच्या शब्दाखातर परदेशात शिक्षण घेण्याचा बेत बाजूला सारून जैन समूहातील विविध उद्योगांच्या बांधणीला त्यांनी प्रारंभ केला. आजही ते स्वतः आणि भवरलालजींचे चार सुपुत्र या कार्यात दिवसरात्र मग्न आहेत. रजनीकांतजींनी आमचा दोन दिवसांचा कार्यक्रम निश्चित करून दिला. त्या कार्यक्रमाकडे वळण्यापूर्वी भवरलालजी जैन या उद्योग क्षेत्रातील तपस्वी द्रष्ट्या पुरुषाबद्दल थोडं सांगितलं पाहिजे.

**जैन समूहाची मुहूर्तमेढ :**

जळगाव जिल्ह्यातील वाकोद या छोट्या गावी एका मारवाडी कुटुंबात थोरल्या भाऊंचा म्हणजे भवरलालजींचा जन्म झाला. आधी ते बीकॉम एलएलबी झाले. त्यानंतर स्पर्धा परीक्षा देऊन शासकीय यंत्रणेत शिरण्याचा त्यांचा मानस होता. शासकीय सेवेकरता त्यांची निवडही झाली होती. परंतु त्यांच्या आईनी त्यांना सांगितलं की नोकरीऐवजी स्वतःच्या व्यवसायात कर्तृत्व दाखव. पुष्कळ लोकांचा पोशिंदा हो. भाऊंचं मन इवल्याशा नोकरीच्या परिघात मावणारं नव्हतं. त्यांना गरुड- झेप घ्यायची होती. १९६२मध्ये ७०००/- रुपये भांडवल आणि तीन कष्टाळू सहकारी यांच्या मदतीने रॉकेलची एजन्सी मिळवून त्यांनी व्यापार सुरू केला. महाराष्ट्राच्या आणि भारताच्या शेतीविषयक गरजा काय आहेत हे जाणून त्यांनी त्यावर संशोधन केलं. नंतर इझ्राईल, अमेरिका, इंग्लड, इटली आणि ऑस्ट्रेलिया या देशांतील उद्योगांबरोबर तंत्रज्ञानात सहकार्य केलं.

**तुमचं 'पपेन' मी का घ्यावं ? :**

प्रारंभीच्या काळात ते रॉकेलबरोबर क्रूड-ऑईल, मोटरसायकल्स, ट्रॅक्टर्स आणि कृषी अवजारंही विकू लागले. १९७८मध्ये केळ्याची पावडर तयार करण्याचा एक आजारी कारखाना त्यांनी विकत घेतला व त्यातच पपईच्या दूधापासून पपेन नावाचं द्रव्य निर्माण करण्यास सुरुवात केली न्यू यॉर्कच्या एन्झाईम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे प्रमुख श्री. जॅक हॅम यांनी लिहिलेल्या एका पत्राने भवरलालजींच्या विचारयंत्रणेला जोरदार धक्का दिला. 'Would you please give three good reasons why I should buy your papin? I don't know you. I don't know your company. I don't know your product. All I know is that you are from India, a country where people are known to cheat foreigners in their dealings.' मी तुमचं पपेन विकत घ्यावं याची तीन कारणं तुम्ही मला देऊ शकाल का? मी तुम्हांला ओळखत नाही. मला तुमची कंपनी माहीत नाही. तुम्ही केलेलं पपेन मी पाहिलेलं नाही. मला एवढंच माहीत आहे की तुम्ही भारतातले आहात आणि भारतीय लोक विदेशी लोकांना उद्योग व्यवहारात फसवतात असं बोललं जातं.

या पत्राने भवरलालजींना चटकाच बसला, पण त्याच वेळी भारतीयांवरचा हा कलंक आपल्या उत्पादनाच्या गुणवत्तेने दूर करण्याचा त्यांनी दृढ निश्चय केला. त्यांचं पपेन आयएसओ ९००१ प्रमाणित आहे. पपेन हे बिअर निर्मितीत व आणखी काही रासायनिक पदार्थांच्या निर्मितीत वापरतात. पपेन निर्मितीत जैन उद्योग समूहाचा जगात दुसरा क्रमांक आहे.

**ठिंबक सिंचनाचा प्रणेता :**

पपेननंतर भाऊ ठिबक सिंचन उत्पादनाकडे वळले. प्रारंभी एका अमेरिकन कंपनीकडून ठिंबक सिंचन यंत्रणा खरेदी करून ते भारतात विकत. परंतु दोन वर्षांतच त्यांनी ही यंत्रणा स्वतः उत्पादित करायला सुरुवात केली, आणि नंतर १ लाख डॉलर्स देऊन ती अमेरिकन कंपनीच सरळ खरेदी केली. ठिबक सिंचनामुळे पाण्याचा वापर ५० ते ६० टक्के कमी होतो. ठिबकद्वारा पाणी पुरवठ्याबरोबर विद्राव्य खत पुरवठाही परिणामकारक रीत्या होतो आणि ३० टक्के खताची बचत होते. त्यामुळे कमी पाण्याच्या प्रदेशांना ठिबक सिंचन हे मोठे वरदान आहे.

यानंतर भाऊंनी जैन हिल्सवर कृषी प्रयोगशाळेची उभारणी केली. ग्रीन हाऊस तंत्रज्ञानावर संशोधन आणि प्रयोग केले. तिथली टोमॅटोची झाडं वीसवीस फूट उंच वाढू लागली आणि एका झाडाला १५ किलोपेक्षा जास्त, घवघवीत, लालचुटुक टोमॅटो लगडू लागले. कांदा आणि लसूण यांच्यावर प्रक्रिया करून त्यांची भुकटी बनू लागली. जैन हिल्सच्या विस्तीर्ण भूमीवर आंब्याचे सोळा हजार वृक्ष डोलू लागले. मोठ्या प्रमाणात आमरस, डाळिंब रस, मोसंबी रस निर्माण करणारा फलप्रक्रिया उद्योग उभा राहिला. आता हा उद्योगसमूह लक्ष केंद्रित करत आहे सौर ऊर्जा उपकरणांच्या निर्मितीवर. भवरलालजींना हिरव्या जगाचा सम्राट म्हणून ओळखलं जातं ते या शेती संबंधित उद्योगांमधील त्यांच्या कर्तृत्वामुळे, आणि आरंभी उघड्या-बोडक्या असलेल्या टेकड्यांवर त्यांनी केलेल्या लाखो वृक्षांच्या लागवडीमुळे !

**निर्माता आणि चिन्तक :**

१९९३-९४ या वर्षात जैन उद्योग समूहाचा वार्षिक नफा २१ कोटी रु. होता. २००६-०७ मध्ये तो ६५० कोटी झाला आणि त्यात २०० कोटींची निर्यात झाली. आज जैन उद्योग समूहाची वार्षिक उलाढाल साडेचार हजार कोटींहून अधिक आहे. पण एक नीतिमान आणि यशस्वी उद्योगपती ही भवरलालजींची फारच अल्प ओळख झाली. महात्मा गांधी आणि जेआरडी टाटा ही त्यांची दैवतं आहेत. 'अनुभूति' नावाची निसर्गाच्या कुशीत वसलेली इंग्रजी माध्यमाची निवासी शाळा हे भवरलालजींचं लाडकं अपत्य आहे. या शाळेची संकल्पना त्यांनी Statement of Purpose या प्रबंधात सविस्तर मांडली आहे. ती शिक्षणतज्ज्ञांना विचार करायला लावेल अशी आहे. सध्याच्या सामाजिक-राजकीय स्थितीवरही त्यांचं चिंतन चालू असतं. आजची समाजरचना, तिचं स्वरूप ½ 'पुनर्बांधणी' या त्यांच्या पुस्तकात त्यांनी भारतीय समाजाच्या प्रश्नांची परखड आणि अत्यंत चपखल मीमांसा

केली आहे. शासनावर अवलंबून राहाण्याची वृत्ती सोडली पाहिजे आणि समाजातील सज्जनशक्ती म्हणजे विधायक विचार नि कार्य करणाऱ्यांची शक्ती संघटित व सुदृढ केली पाहिजे अशी मांडणी त्यांनी केली आहे.

**गांधीतीर्थ आणि अद्‌भुत लोकसंग्रह :**

विनोबाजी आणि महात्माजी यांच्या विचारांची कालोचित मांडणी करणं त्यांना आवश्यक वाटतं. जैन हिल्सवर गांधी तीर्थ नावाचा एक प्रेरणादायी प्रकल्प त्यांनी उभारला आहे. भवरलालजींच्या पत्नी कांताबाईंबरोबरच्या आपल्या सहजीवनाची अत्यंत हृद्य गाथा त्यांनी लिहिली आहे. भवरलालजींचा लोकसंग्रह अद्‌भुत आहे. विविध क्षेत्रांमधील गुणवंत व्यक्तींशी त्यांनी स्नेह जोडला आणि दशकानुदशके तो टिकवला - वाढवलाही आहे. या परिवारात स्वरसम्राज्ञी आशाताई भोसले, प्रतिभावंत कवी ना. धों. महानोर यांच्यापासून ना. शरद पवार आणि मा. भैरवसिंह शेखावत यांसारखे राजनेतेही आहेत. एवढा प्रचंड व्याप सांभाळणारे भाऊ अत्यंत कुटुंबवत्सल आहेत आणि आपल्या नातवंडांच्या जडण-घडणीतही त्यांचं बारकाईने लक्ष असतं. अशा एका सव्यसाची व्यक्तिमत्त्वाने निर्माण केलेल्या दुनियेत आम्ही आलो होतो.

**फलप्रक्रिया आणि ऊतिसंवर्धन :**

६ ऑगस्टच्या सायंकाळीच जैन हिल्सचे फळबाग तज्ज्ञ डॉ. बालकृष्णन यांच्याशी आमची भेट झाली. अगदी जवळजवळ अंतरावर फळांच्या रोपांची लागवड करून त्यातून भरघोस आणि लवकर फळपिकं कशी येतील यावर त्यांनी केलेल्या यशस्वी प्रयोगांची त्यांनी माहिती सांगितली. प्रसिद्ध संगीतकार आणि गायक श्री. अवधूत गुप्ते यांचे वडील जाहिरात क्षेत्रातील ख्यातनाम तज्ज्ञ आहेत. ते भवरलालजींचे जुने मित्र आहेत. जैन समूहाच्या चित्तवेधक जाहिराती त्यांनीच तयार केलेल्या असतात, त्यांचीही भेट झाली.

दि. ७ ला सकाळी आम्ही आंबा, आवळा, मोसंबी यांच्या भरदार फळबागा पाहिल्या आणि त्या फळांवर प्रक्रिया करणारा प्रचंड उद्योगही पाहिला. कारखान्याच्या दाराशी एका मखमली सूचनाफलकावर सोनेरी धातूंच्या अक्षरांमध्ये आमची नावं होती आणि स्वागताचे शब्द होते. फळं धुणं, त्यांच्या साली काढणं, रस तयार करणं, तो गाळणं आणि मोठमोठ्या पिंपामध्ये भरून बंद करणं, ही सर्व प्रक्रिया यंत्रांवर चाललेली होती. कारखान्यात विलक्षण स्वच्छता होती. कांद्याची भुकटी करण्यासाठी लागणाऱ्या सघन अशा कांद्याची लागवड शेतकऱ्यांना शिकवून मोठं उत्पादन घेतलं जातं. ऊती संवर्धन विभागात अशा सहा-सहा कोटी दमदार रोपांची निर्मिती आणि संगोपन केलं जात असलेलं पाहिलं. त्याला अनेक वर्षांच्या सखोल संशोधनाचं पाठबळ आहे.

**सूक्ष्म सिंचन :**

एका खुल्या जागेत विविध सिंचन पद्धती आणि त्यासाठी लागणारी उपकरणं यांची नमुना मांडणी केलेली होती. ठिबकच्या नळ्या जशा जमिनीच्या पृष्ठभागावर अंथरतात तशाच जमिनीच्या पोटातूनही नेता येतात. तुषार सिंचनाच्याही विविध परीघ-क्षेत्रांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या यंत्रणा आहेत. त्या संगणकावरून नियंत्रित करता येतात हेही पाहिलं. पूर्वी शेतकऱ्याची अशी समजूत होती की पिकांना मोकळं पाणी दिलं म्हणजे ती तरारतात. पण ही समजूत जैन इरिगेशनने खोटी ठरवली आहे. कमी पाण्यातही ठिबक सिंचनाने तेवढीच रसरशीत पिकं येतात असं सिद्ध केलं आहे.

**इंधन प्रश्नावर काम :**

इंधन समस्येबद्दल आपण नेहमी वाचतो. जमिनीच्या पोटातलं तेल संपलं की पुढे काय? या प्रश्नाचं उत्तर जैन समूह शोधत आहे. त्यांनी PV(Photo Voltaic) सौर पॅनेल्स तयार करण्याचा कारखाना सुरू केला आहे. सौर शक्तीवर चालणारे पंप ते तयार करतात आणि वापरतात. आणखीही सौर उपकरणं तयार करण्याचं काम चालू आहे. ३५ एकरांच्या मोठ्या माळावर सौर पॅनेल्सचा एक थवाच उतरला आहे. त्यातून ८.५ मेगॅवॉट विजेची निर्मिती होते. जैव वायूवर बीज निर्मिती करण्याचाही मोठा प्रकल्प तेथे आहे. फळांच्या साली आणि अन्य पदार्थ व शेण या सर्वातून जैव इंधन वायू तयार होतो. यांपैकी प्रत्येक उद्योगाची झेप चकित करणारी आहे.

**निर्मात्याची भेट :**

डॉ. रवीन्द्रजी नातू हे आमची आणि भवरलालजींची भेट घडवून देण्यासाठी उत्सुक होते. परंतु त्या दिवशी भाऊंची प्रकृती बरी नव्हती. तथापि दुसऱ्या दिवशी नेब्रास्काहून एक तज्ज्ञांचा गट जैन हिल्सला येणार होता. त्यामुळे आपण आज जाऊन तर पाहूया ! प्रकृती बरी असली तर भेट होईल. असं म्हणून रवींद्रजी आम्हांला सायं.४च्या सुमाराला 'कांताई' या भवरलालजींच्या भल्या प्रशस्त कार्यालयात घेऊन गेले. भाऊंना बरं नव्हतंच, पण ते बाजूला ठेवून त्यांनी अत्यंत आत्मीयतेने आमचं स्वागत केलं. हराळीच्या फलप्रक्रिया विभागातील विविध उत्पादनांचे नमुने आम्ही त्यांना भेट म्हणून दिले. त्यांच्याजवळ आम्ही दिलेलं टिपण होतंच. ते वाचून त्यावर त्यांनी खुणा करून ठेवल्या होत्या. भराभर अनेक गोष्टी सुचवायला त्यांनी सुरुवात केली. फलोद्यान तज्ज्ञ डॉ. बालकृष्णन यांनी हराळीला भेट देऊन तेथील फळबागांची पहाणी करावी आणि सूचना कराव्यात. श्री. रावतळे आणि

श्री. येवले यांनी ठिबक सिंचन यंत्रणेची पाहाणी करावी. श्री. अभिषेक सत्यम् यांनी जैव वायूपासून जैव विद्युत ऊर्जा कशी करता येईल यासंबंधीची रचना आणि मांडणी करून द्यावी. फलोत्पादनाच्या विश्लेषणातील तज्ज्ञ श्री. सुनील देशपांडे यांनी हराळीच्या फलोत्पादनांचं विश्लेषण आणि प्रमाणीकरण याबाबतीत मार्गदर्शन करावं असं त्यांनी सुचवलं. या सर्वांची आणि आमची त्याच दिवशी संध्याकाळी एकत्र भेट आणि चर्चाही झाली.

**आणखी काही सहयोग :**

नंदुरबार-जळगाव परिसरातील आदिवासी समाजांमधील मुलांना शिकविण्यासाठी हराळीला पाठवावं असं आम्ही सुचवलं होतं. या मुलांच्या शिक्षणाचा खर्च आपण करू असं भाऊ म्हणाले. 'अनुभूति' या जैन समूहाच्या शाळेत मुलांना गांधी जीवन विचारांची ओळख करून देणं, गांधीजींच्या आश्रमातील प्रार्थना, तसंच सर्वधर्म प्रार्थना शिकवणं, सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी विद्याव्रत संस्कार करणं, अभ्यास कौशल्यं, प्रतिभा विकास यांची सत्रं घेणं, असे काही उपक्रम आम्ही सुचवले होते. त्यांचं त्यांनी स्वागत केलं. 'क्रमशः सुरुवात करूया' असं ते म्हणाले. प्रबोधिनीच्या प्रज्ञा मानस संशोधिकेत व्यवस्थापन कौशल्यांवर संशोधन आणि त्यांचं प्रशिक्षण गेली वीसहून अधिक वर्षे सुरू आहे. कर्मचाऱ्यांच्या क्षमता चाचण्या आणि व्यक्तिमत्त्वाचं मूल्यमापन यावरही आपण पुष्कळ वर्षं करत आहोत. जैन समूहाच्या कर्मचारी सदस्यांसाठी या प्रकारचं कामही करता येईल असं आम्ही म्हटलं. नंतर रजनीकांतजी जैन यांच्याबरोबर सविस्तर चर्चा झाली. भवरलालजींच्या वागण्यात एक अकृत्रिम साधेपणा आणि प्रसन्न सहजता आहे. पन्नास हजार कोटींचा स्वामी असलेल्या आणि दरवर्षाला साडेचार हजार कोटींची उलाढाल करणाऱ्या व्यक्तीशी संवाद चालू आहे अशी पुसटशी जाणीवही ते होऊ देत नाहीत. निरोप घेताना त्यांची आणि अण्णांची हृद्य गळाभेट झाली. रवीन्द्रजी नातूही प्रसन्न होते. जैन हिल्सवरचा दुसरा दिवस भाऊंच्या भेटीने सुफळ संपूर्ण झाला होता.

८ ऑगस्टला आम्ही प्रथम जैन हिल्सवरच्या अद्ययावत अशा निसर्गोपचार केंद्रात गेलो. तिथे निसर्गोपचार, आयुर्वेद, होमिओपथी आणि इतर वेगवेगळ्या उपचार पद्धतींवर उत्तम ग्रंथसंग्रह आहे. पंचकर्म चिकित्सेची सर्व साधनं आणि उपचार करणारे तज्ज्ञ आहेत. भाऊंना आत्तापर्यंत सहा वेळा हृदय विकाराचे झटके येऊन गेलेत. दोनदा बायपास शस्त्रक्रिया झाली आहे. रोज ४ वेळा E.C.G काढला जातो. जीवनाची अशाश्वती कळल्यामुळेच प्रत्येक क्षणाचा पुरुषार्थी उपयोग केला पाहिजे असं भवरलालजींना वाटत असेल का?

**'अनुभूति'च्या परिसरात :**

निसर्गोपचार केंद्रातून आम्ही भाऊंना अत्यंत प्रिय असलेल्या त्यांच्या अनुभूति या निवासी विद्यालयाकडे गेलो. भाऊंचे चिरंजीव अनिलजी यांच्या पत्नी सौ. निशाताई जैन या अनुभूतिच्या संचालिका आहेत. या विद्यालयाचे संपर्क प्रमुख श्री. अरुणजी कुलकर्णी यांनी विद्यालयाची विविध दालनं दाखवली. हिरव्यागार वनराईच्या कुशीत लपलेली ही शाळा मोठी वेधक आहे. विद्यार्थ्यांनी केलेल्या सुंदर वस्तूंनी, चित्रांनी नटलेली भव्य क्रीडांगणं, अत्यंत संपन्न प्रयोगशाळा आणि तेथे शिकणारे देशाच्या विविध भागांतून आलेले २०० विद्यार्थी. ठिकठिकाणी निरागस बाळांची लोभस शिल्पं आहेत. या ठिकाणी वनराजी असल्यामुळे सापांचं प्रमाणही भरपूर. बांधकाम चालू असताना आणि नंतरही विविध जातींचे ३२५ साप येथे निघाले. त्यात जातिवंत नागसुद्धा सापडले. पण एक वगळता उरलेल्या ३२४ सापांना दूर जंगलात सोडून देण्यात आलं. मुलांना गरम पाण्यासाठी, इस्त्रीसाठी सौर-ऊर्जेचा वापर केला जातो. भोजनगृह साधं पण प्रशस्त आणि सुविधायुक्त आहे. जेवण मात्र जमिनीवर बसून केलं जातं. त्यासाठी टेबल-खुर्च्या नाहीत. शाळेचं वार्षिक शुल्क १,७५,००० रुपये (पावणे- दोन लाख रुपये) आहे.

**गांधी तीर्थ - प्रेरणा तीर्थ :**

अनुभूतिमधून बाहेर पडून आम्ही गांधी तीर्थला गेलो. देशभरातून सुमारे ३५ अभ्यासक तिथे गांधी वाङ्मयावर पीएचडीचा अभ्यास करायला आले होते. एका भव्य वास्तूमध्ये महात्माजींच्या जीवनावर चित्रप्रदर्शनी आहे. प्रकाश आणि ध्वनी यांचा कल्पकतेने उपयोग करून महात्माजींच्या जीवनातील अनेक प्रसंग तेथे जिवंत केले आहेत. सेवाग्राममध्येही आम्ही गेलो आहोत, पण तिथे इतिहासाचा एक कालखंड थबकल्यासारखा, स्तब्ध झाल्यासारखा वाटतो. गांधी तीर्थमध्ये मात्र गती आहे, चैतन्य आहे, आणि गांधी विचारांसह भविष्यकाळाकडे झेपावण्याची उमेद आहे. या गांधी चित्रप्रदर्शनीचं वैशिष्ट्य असं की यात गांधीजींचा देहान्त दाखवलेला नाही. कारण महात्मा गांधी नावाच्या चैतन्याला अस्त नाही, अंत नाही, अशी या तीर्थाच्या निर्मात्यांची श्रद्धा आहे. गांधीजींचा अंत न दाखवण्यामागे केवढी सुज्ञता, केवढी दूरदृष्टी आहे हे जाणवून निर्मात्यांबद्दलचा आदर द्विगुणित झाला.

**प्लॅस्टिक पार्क :**

जैन हिल्सपासून सुमारे १०-१२ किमीवर जैन समूहाचा प्लॅस्टिक पार्क आहे. तिथे दुपारी गेलो होतो. ठिबक सिंचनाला लागणारे लहान मोठे सुमारे ५०० भाग या ठिकाणी तयार होतात. तेथील संपर्क प्रमुख श्री. दिनेशजी देसाई हे मोठं प्रसन्न व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्याबरोबर या अवाढव्य

कारखान्याच्या विविध भागांमध्ये आम्ही उघड्या रिक्षातून फिरलो. ५-६ फूट प्रचंड व्यासाच्या आणि अगदी चिमुकल्या व्यासांच्याही जलवाहिन्या पाहिल्या. त्यातले छोटे-मोठे व्हॉल्व्हज पाहिले. रोज साऱ्या देशातून येथे वितरक येत असतात. त्यांची प्रशिक्षणं चालू असतात. सिंचन क्षेत्रांत जगभरात कार्यरत असलेल्या ७ हजारांहून अधिक संस्थांनी एकत्र येऊन इरिगेशन असोसिएशन, अमेरिका, ही संस्था स्थापन केली. या संस्थेतर्फे जागतिक स्तरावर क्रॉफर्ड रीड स्मृती पुरस्कार दिला जातो. गेल्या १९ वर्षांत हा पुरस्कार फक्त १२ व्यक्तींना दिला गेला. त्यांपैकी दोन व्यक्तीच आशिया खंडातल्या होत्या आणि त्यांच्यांपैकी एक भवरलालजी जैन आहेत. ठिबक सिंचनाला अद्यापी पायाभूत उद्योग मानलं जात नाही, वित्तीय प्रकल्प प्रस्तावांमध्ये त्याचा समावेश नाही, याची भाऊंना खंत वाटते. ते म्हणतात. ज्या ठिंबक सिंचनाची आपण ओवाळून आरती केली पाहिजे, त्यावर बंधनकारक कर, अबकारी कर लादले जात आहेत आपल्या शेतीप्रधान देशात याचंसुद्धा मला दुःख आहे.

अपयशाचे चटकेही जैन समूहाला बसले आहेत. वित्तीय सेवा, संगणक क्षेत्र आणि ग्रॅनाईट या व्यवसायांमध्ये धाडसाने पाऊल घातलं पण ते निर्णय योग्य नव्हते. त्यामुळे तोटा सोसावा लागला अशी प्रांजळ कबुलीही भवरलालजींनी दिली आहे.

**नव्या पर्वाचा शुभारंभ :**

दि. ८च्या संध्याकाळी आम्ही रवीन्द्रजींबरोबर आणि रजनीकांतजींबरोबर बोलत होतो. जैन समूह जी सौर उपकरणं तयार करणार आहे त्यासंबंधी हराळी आणि परिसरातील तरुणांचं प्रशिक्षण करायचं. त्यांना स्वतंत्र किंवा नियुक्त वितरक बनवण्यासाठी प्रोत्साहन द्यायचं. टिश्यू कल्चर केलेल्या रोपांचं हार्डनिंग म्हणजे संगोपन करण्याचं प्रशिक्षण हराळी परिसरातील स्त्रियांना द्यायचं, त्यांच्यासाठी तो पूरक उद्योग होऊ शकतो. शिवाय भवरलालजींनी सुचवलं की जैन समूहातून फलरस मोठ्या प्रमाणावर घेऊन त्याची छोट्या पॅक्समध्ये विक्री करावी. एकूण हराळी फलप्रक्रिया उद्योगाने सोलापूर आणि लातूर येथे विक्री केंद्र उघडावीत असा त्यांचा सल्ला होता. या सर्व कल्पनांबाबत चर्चा झाली. आम्हां सर्वांची मनं उल्हसित होती. एका नव्या पर्वाचा शुभारंभ होत असल्याचं आम्हांला जाणवत होतं.

**कल्पक कृषी पर्यटन केंद्र :**

९ऑगस्टला सकाळी आम्ही डॉ. रवी आणि डॉ. सौ. रेखाताई महाजन यांनी मोठ्या कल्पकतेने निर्माण केलेल्या कृषी पर्यटन केंद्रामध्ये गेलो होतो. हे दोघेही व्यवसायाने डॉक्टर. त्यांची मोठी प्रॅक्टीस जळगावात आहे. ती सांभाळून त्यांनी हे हिरवं विश्व उभं केलं आहे. सुमारे २०-२२ एकरांच्या या परिसराला सर्व बाजूंनी कुंपण आहे. बांबूची घरं आहेत. बाबूंना कीड लागू नये यासाठी ते त्यावर काही रासायनिक प्रक्रिया करत असतात. डॉ. रवी हे किडनी तज्ज्ञ आहेत. त्यामुळे त्यांनी किडनीच्या आकाराचं एक सुरेखसं शेत तळं बनवून घेतलं आहे. त्यामध्ये बारा महिने पाणी असतं आणि त्यात नौकानयनही करता येतं. पाण्याच्या शीतल प्रवाहात मजेत चालता येईल आणि तुषारांमध्ये नृत्य करता येईल अशीही योजना त्यांनी केली आहे. विविध प्रकारचे प्राणी आणि पक्षी यांच्या आवाजांनी पर्यटन केंद्राचा परिसर चैतन्यमय झालेला असतो. महाजन दांपत्य रसिक आहे. त्यामुळे ते येथे सुरेख मैफिलीही भरवत असतात. जळगाव हा देखील कमी पाण्याचा जिल्हा. पण महाजन पतिपत्नींचं हे पर्यटन केंद्र या रूक्ष प्रदेशाला पडलेलं हिरवं स्वप्न आहे.

**नीलिमादीदींचा प्रकल्प - बहादरपूर :**

डॉ. रवी आणि रेखाताईंचा निरोप घेऊन आमचा प्रवास नीलिमादीदी मिश्रांच्या बहादरपूर या गावाकडे सुरू झाला. नीलिमादीदी काही कामानिमित्त मुंबईला गेल्या होत्या. त्यांचे आईवडील घरी होते. त्यांचे दोन सहकारी श्री. विनोद सोनार आणि श्री. किरण चौधरी यांची भेट झाली. नीलिमादीदींनी बहादरपूर आणि परिसरातल्या गावांमध्ये १५०० महिला बचतगट संघटित केले आहेत. या महिला अत्यंत उत्तम दर्जाच्या गोधड्या तयार करतात. त्यांची देशविदेशात विक्री होते. रूफ वॉटर हार्वेस्टिंग म्हणजे छतावर पडलेलं पाणी अंगणात उतरवून खड्ड्यांमध्ये साठवायचं अशी व्यवस्था बहादरपूरमधल्या घरोघरी दिसली. प्रत्येक घरासमोर झाडं लावलेली होती. जी कुटुंबं हे सारं करतील त्यांना कर्ज द्यायचं अशी नीलिमाताईंची योजना आहे. ज्या घरी छताचं पाणी साठवलं जाईल, झाड असेल, शौचालय असेल आणि घरचा मालक व्यसनमुक्त असेल त्यांनाच कर्ज दिलं जातं. त्यामुळे गावाचा चेहरामोहरा खूप सुधारलेला आहे. विनोद सोनारांच्या पत्नी सौ. पौर्णिमा सोनार या मोठ्या गतिमान आणि तरल कार्यकर्त्या आहेत. दीदींच्या आईंनी आम्हांला प्रेमाने जेवू घातलं. त्यांच्या वडिलांना इंग्रजी कादंबऱ्या वाचण्याची आवड आहे. त्यामुळे त्यांची आणि लताताईंची थोडा वेळ चर्चा रंगली. त्यांना प्रणाम करून आम्ही बहादरपूरचा निरोप घेतला.

परतीच्या मार्गावर पारोळा लागत होतं. १९६१-६२मध्ये आण्णा पुणे विद्यार्थी गृहात शिक्षक म्हणून काम करत असताना ८वी- मध्ये नारायण शंकर कटेकर नावाचा विद्यार्थी होता. हाताला खरूज झाल्यामुळे आण्णांकडून तो होमिओपथीचं औषध घेत होता. खरूज बरी झाली. पण कोष्टी समाजाच्या घरचा हा मुलगा स्वकष्टाने आणि चिकाटीने एमए झाला आणि

पारोळ्यालाच महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून लागला. नोकरी करत तो पीएचडी झाला. वेळोवेळी त्याचा आण्णांशी संपर्क होताच. तेव्हा येताना डॉ. नारायण कटेकरांकडे ते आवर्जून गेले. दोघांनाही अनेक वर्षांनंतर झालेल्या या भेटीचा मनापासून आनंद झाला.

**यजुर्वेंद्रचं ध्येयप्रवण कर्तृत्व :**

जळगावला सायंकाळी आम्ही डॉ. अविनाश आचार्य यांच्या घरी आलो. डॉ. आचार्य हे संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि जळगाव बँकेचे शिल्पकार. त्यांचे जामात डॉ. संजीव हुजुरबझार हे जळगावमधले मोठे न्यूरो-सर्जन आहेत. त्यांच्याकडे पेयपान झालं. तरुण भारतच्या प्रतिनिधींनी तिथेच लताताईंची मुलाखत घेतली. आमचे तडफेचे युवक मित्र श्री. यजुर्वेंद्र महाजन यांनी जळगावमधल्या तरुणांना स्पर्धा परीक्षांचं वेड लावलंय. पुण्याच्या ज्ञान प्रबोधिनीत डॉ. विवेक आणि सौ. सविताताई कुलकर्णी हे स्पर्धा परीक्षा केंद्र अत्यंत यशस्वी रीतीने चालवतात. यजुर्वेंद्रांनी तिथे स्पर्धा परीक्षांची तयारी केली. त्यात ते यशस्वीही झाले. परंतु सरकारी नोकरीत न शिरता त्यांनी जळगावला स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू केलं. ज्या विद्यार्थ्यांना शहरात राहून शिकणं परवडत नाही त्यांची विशेष सोय केली. सगळ्या महाराष्ट्रातून आज जळगावला त्यांच्याकडे स्पर्धा परीक्षांच्या मार्गदर्शनासाठी विद्यार्थी येत असतात. यजुर्वेंद्रांनी शिक्षकांमध्येही मोठी प्रेरणा निर्माण केली आहे. ते स्वामी विवेकानंदांचे मोठे भक्त आहेत. लताताईंनी अनुवादित केलेल्या स्वामीजींच्या 'हिंदु तेजा जाग रे' या विचार संकलनाचा आपल्यावर खूप मोठा परिणाम झाला असं ते सांगतात. त्यांनी ९ ऑगस्टला सायंकाळी स्पर्धा परीक्षांचे विद्यार्थी आणि विविध संस्थांमध्ये काम करणारे शिक्षक-शिक्षिका यांचा मेळावा बोलावलेला होता. या मेळाव्यात 'अन् गाव हसलं' ही हराळीवरची चित्रचकती (सीडी) दाखवली. आण्णा आणि लताताई यांचा मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. 'शिक्षणातील दुसरी क्रांती - गुणवत्तेची' या विषयावर लताताईंचं व्याख्यान झालं. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा विस्तार झाला. परंतु गुणवत्ता वाढली नाही. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेकडे आणि शिक्षकांच्या अध्यापनाच्या गुणवत्तेकडे कोणकोणत्या बाजूंनी लक्ष दिलं पाहिजे याचं विवेचन त्यांनी केलं. 'जे तोंडात सोन्याचांदीचे चमचे घेऊन जन्माला आले त्यांच्यात देशाचं रूप पालटण्याची प्रेरणा निर्माण होणं कठीण. आपण शेतकऱ्यांची मुलंच देशाचं रूप पालटू शकू' हे त्यांचे शब्द मुलांच्या मनाला खोलवर स्पर्श करून गेले.

**दिशादर्शी 'दीपस्तंभ' :**

रात्री यजुर्वेंद्रजींच्या घरी जेवायला गेलो होतो. त्यांच्या आई, पत्नी मानसीताई आणि दोन छोटी गोड मुलं - ओवी आणि श्लोक या सर्वांच्या भेटी झाल्या. त्यांचे काका प्रतिभावान आर्किटेक्ट श्री. शरद महाजन यांचीही भेट झाली. मळलेली वाट सोडून यजुर्वेंद्रजींनी नवी वाट शोधायला घेतली आहे. त्यांच्या आई आणि पत्नी त्यांचा जगावेगळा ध्यास समजून घ्यायचा प्रयत्न करत आहेत. स्वामी विवेकानंदाच्या प्रेरणेतून जन्माला आलेली दीपस्तंभ ही संस्था एकविसाव्या शतकात तरुणाईसाठी खरोखर दिशादर्शी दीपस्तंभ ठरेल असा विश्वास यजुर्वेंद्रांचं कार्य पाहून वाटला.

१० ऑगस्टला श्री. चंद्रकांत पाटील यांच्या मेणगाव येथील घरी गेलो. त्यांचे आई-वडील आणि काका-काकू यांनी प्रेमाने स्वागत नि पाहुणाचार केला. तेथून परतीच्या मार्गावर शनिशिंगणापूर येथे शनिदेवांचं दर्शन घेतलं. नेवासे येथे पैसाच्या खांबाचं दर्शन घेतलं. नामवंत लेखिका दुर्गाताई भागवत यांनी 'पैस' या नावाचा एक अत्यंत सुंदर लेख या नेवाशाच्या पैसाच्या खांबाविषयी लिहिलेला आहे. पैस याचा शब्दशः अर्थ अवकाश किंवा इंग्रजीत स्पेस. दुर्गाताईंनी म्हटलं आहे की ज्या खांबाला टेकून ज्ञानराजांनी ज्ञानेश्वरी सांगितली तो पाषाणाचा स्तंभ जरी लहानसाच दिसला तरी त्याची उंची गगनाला जाऊन भिडलेली आहे. त्याचं अदृश्य स्वरूप पाहाण्याची दृष्टी थोड्यांनाच असते. ती उंची ज्ञानदेवांच्या प्रतिभेची आहे. आम्ही पैसाच्या खांबाचं दर्शन घेतलं. मनश्चक्षूंपुढे तिथे निरूपण करणारी ज्ञानदेवांची युवा मूर्ती, त्यांच्याकडे कौतुकाने पाहाणारे निवृत्तिनाथ, वैराग्यमूर्ती सोपानदेव आणि चित्कळिका मुक्ताबाई या सर्वांची रूपं दिसू लागली. शांत आणि अद्भुत रसात न्हाणारी ती श्रोतृसभा दिसू लागली. आम्ही शांतपणे डोळे मिटून गाभाऱ्यापुढे बसलो. पैसाच्या खांबापुढे थोड्या अंतरावर जगताची मातापितरं असलेल्या विठ्ठल-रखुमाईची प्रसन्न वत्सल रूपं होती. ज्ञानेश्वरीच्या साररूप असलेल्या ओव्या आम्ही म्हणत होतो -

*तया सर्वात्मका ईश्वरा, स्वकर्मकुसुमांची वीरा।*
*पूजा केली होय अपारा, तोषालागी॥*

जणू आम्ही या जन्मातलं संचित कर्म माउलींच्या चरणांवर अर्पण करत होतो. शरणतेने भूमीवर मस्तक टेकून माउलींना प्रणाम केला. नंतर प्रवासात सारेजण मौनमौनच होतो.

* * *

***आपण हा पहिला धडा घेतला पाहिजे की मी बाहेरील कोणत्याही गोष्टीला केव्हाही शिव्या देणार नाही. दुसऱ्या कोणालाही मी दोष देणार नाही असा निश्चय करा. धीट व्हा आणि सारा दोष स्वतःवर घ्या. अशी वागणूक हीच खरी वागणूक आहे असे तुम्हांला दिसून येईल. म्हणून आधी स्वतःमध्ये सुधारणा करा.***

***- स्वामी विवेकानंद***

# ६. जैन समूहाच्या अनुभूति विद्यालयातील विद्याव्रत संस्कार

ऑगस्ट २०१२मध्ये हराळीच्या कार्यकर्त्यांची पहिली भेट जळगावच्या जैन उद्योग समूहाला झाली. त्यानंतर काही शैक्षणिक उपक्रम तेथील अनुभूति विद्यालयात करता येतील असं आपण तेथील अधिकाऱ्यांना सुचवलं. त्यात महात्मा गांधी विचार अभ्यास शिबिर, प्रतिभाविकास व वाचनकौशल्यं आणि व्यक्तिमत्त्व विकसनासाठी विद्याव्रत संस्कार असे तीन उपक्रम सुचवले होते. अनुभूति विद्यालयाच्या संचालिका सौ. निशाताई जैन यांनी सुचवलं की प्रथम आपण विद्याव्रत संस्काराचा प्रयोग करावा. त्यानुसार आण्णा, लताताई, संरेखाताई लबडे आणि स्वातीताई बर्गे असे चौघेजण ५ ऑक्टोबरला सायंकाळी जळगावच्या जैन हिल्सवरच्या अनुभूति विद्यालयात पोचले. त्या दिवशी रात्री सौ. निशाताई, सौ. पूजाक्का देशपांडे, सर्वश्री. मनोज परमार, आलोक मोहंती, सिद्धार्थ पाटील आणि दीपक राठोड या शिक्षकांसमवेत ५ ते १० ऑक्टोबरच्या कार्यक्रमाची निश्चिती केली. त्यात ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकाससंबंधी व्याख्यानं, विद्याव्रत संस्कार पोथीचा सराव, ५वी ते ८वी या गटासाठी प्रतिभाविकास सत्रं, सर्वांसाठी मिळून काही संगीत सत्रं व शिक्षकांसाठी एक व्याख्यान याप्रमाणे योजना केली. निशाताईंना काही महत्त्वाच्या कामासाठी मुंबईला जाणं आवश्यक होतं. त्यामुळे त्या वरील कार्यक्रमांना नव्हत्या. पूजाक्का, सिद्धार्थदादा आणि दीपकदादा यांनी सर्व दिवस खूप मनापासून मदत केली. अनुभूति विद्यालयाचा परिसर प्रशस्त आहे. मोठमोठी हिरवीगार मैदानं, भव्य सभागृह, नृत्य कक्ष, कला कक्ष, संगीत कक्ष, दृकश्राव्य कक्ष असे मोठमोठे कक्ष, एका वर्गात अगदी मर्यादित विद्यार्थी संख्या, आणि त्यामानाने प्रशिक्षित शिक्षकांची मुबलक संख्या, असं या विद्यालयाचं स्वरूप आहे. ठिकठिकाणी बसवलेली चिमखड्यांची शिल्पं आकर्षित करणारी आहेत. उत्तम पुस्तकं असलेलं ग्रंथालय आहे. भोजन कक्षही चांगला ऐसपैस आहे. तिथे थोडीही अस्वच्छता नाही. अन्न चवदार असतं.

**चांगला प्रतिसाद :**

दि. ६ पासून आमच्या कामाला सुरुवात झाली. मुलांचा प्रतिसाद चांगला होता. मुलं लाघवी आहेत. तिथले संगीत शिक्षकही चांगले जाणकार आहेत. काही जणांना संस्कार, दीक्षा, दीक्षाचिन्ह, गायत्री मंत्र, या सर्व गोष्टी थोड्या नवीन आणि अनपेक्षित होत्या. त्याबद्दल त्यांच्या मनात शंका होत्या, पण ते प्रत्यक्ष सहभाग घेत गेले तशा शंका कमी होत गेल्या आणि तेही कार्यक्रमाशी समरस झाले. लताताईंनी प्राचार्यांसह सर्वांना विद्याव्रत संस्कारामागचा हेतू, त्याची व्यापकता हे समजावून सांगितलं. मा. श्री. भवरलालजी जैन आणि त्यांच्या स्नुषा निशाताई यांच्याशी चर्चा करून त्यांनी सुचवल्यावरून हा कार्यक्रम घेतला जात आहे याचीही सर्वांना कल्पना होती. हा कार्यक्रम सर्व धर्मांच्या विद्यार्थ्यांना उपयोगी आहे हेही सर्वांच्या ध्यानात आलं.

**जीवन हाच एक यज्ञ :**

बुधवारी १० ऑक्टोबरला सकाळच्या प्रसन्न वेळी अनुभूति विद्यालयाच्या भव्य सभागृहात विद्याव्रत संस्कार संपन्न झाला. स्वतः मा. भवरलालजी, त्यांचे निकट सहकारी श्री. रजनीकांतजी जैन आणि श्री. रवींद्रजी नातू हे कार्यक्रमाला उपस्थित होते. उपासनेची रचना हिंदीतून केलेली होती. नेहमीच्या 'काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल' या अभंगाऐवजी नरसी मेहतांचा 'वैष्णवजन तो तेणे कहिये' हा अभंग गायिला गेला. प्रख्यात राजकीय नेते श्री. अरुण गुजराथी यांची नात कु. अनीशा गुजराथी ही अनुभूति विद्यालयातील बुद्धिमान आणि प्रगल्भ विद्यार्थिनी आहे. तिचं उत्तम भाषण यावेळी झालं. उमेश अग्रवाल हा विद्यार्थी प्रतिनिधीही चांगलं बोलला. मा. भवरलालजी तथा बडे भाऊ आपल्या (इंग्रजी) भाषणात म्हणाले की, 'आता विद्याव्रतसंस्कारात आपण यज्ञ केला. यज्ञ हे काही कर्मकांड नाही. ती अग्नी या निसर्गदेवतेची पूजा आहे. खरं म्हणजे सर्व जीवन हाच एक यज्ञ आहे. संपूर्ण चित्त देऊन केलेलं कर्म हे यज्ञरूप होतं. असा यज्ञ आपलं शरीर, मन, बुद्धी यांना शुद्ध करतो आणि त्यांना मलीन करणाऱ्या व्यसनांसारख्या गोष्टीपासून तो आपल्याला दूर ठेवतो. त्यामुळे विद्यार्थी जीवनात त्या यज्ञाचं आणि विद्याव्रत संस्काराचं महत्त्व आहे. तो अनुभूति विद्यालयात करण्यासाठी आण्णा, लताताई आपल्या सहकाऱ्यांना घेऊन आले यासाठी मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो.'

कार्यक्रमानंतर दुपारी सोलापूर-हराळीच्या परतीच्या प्रवासाला निघालो. श्री. अरुण कुलकर्णी हे विद्यालयाचे व्यवस्थापक निरोप द्यायला स्थानकावर आले होते. त्यांच्याशी आणि अनुभूतिमधील शिक्षकांशी व विद्यार्थ्यांशी नव्याने स्नेहबंध जुळला होता. ९ला सायंकाळी भवरलालजींकडे भोजनासाठी गेलो होतो. त्यावेळी महत्त्वाच्या शैक्षणिक प्रश्नांबाबत चर्चा झाली. तो आनंद आणि ते विचारमंथन परतीच्या प्रवासात मनात रेंगाळत राहिलं.

* * *

***तुम्ही स्वार्थशून्य आहात की नाही? असाल तर मग एकही धर्मग्रंथ न वाचता तुम्ही सिद्ध होऊ शकाल.***